'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF)–6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) –0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66-
ISSN : 2348-7143
October. 2018

ठरतो. जागतिक तापमान वाढीमुळे आज जगात युध्दजन्य परिस्थिती आहे असा निकोलस बर्न यांचा २००६ चा अहवाल सांगतो आहे. पण हीच गोष्ट आमच्या संत तुकारामांनी फार पूर्वी सांगितली होती आणि यावरील उपायसुध्दा.

**वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे**
**पक्षीही सुस्वरे आळविती ||**

अशी ही पर्यावरणावर जीवापाड प्रेम करणारी नव्हे निसर्गाच्या प्रत्येक शक्तीला पूजणारी मराठी कविता आहे. पण आकडेवारी आणि आलेखाच्या मागे लागलेली आपली तार्कीक मानसिकता मराठी कवितेच्या भावनात्मकतेची सरासरी कधीच काढू शकली नाही. हे ही खरे आहे. म्हणूनच पर्यावरण ऱ्हास, निसर्गाची अनियमितता, प्रदुषण या साऱ्या प्रश्नांना वाचा फोडतांना हनुमंत चांदगुडे म्हणतात की,

**दोस्ता तुला खर सांगतो**
**खर कोणचं भेटत नाय |**
**पिशवी मधलं दूध आता**
**खव्यासारखं आटत नाय ||**

**संदर्भ सूची :**

१. दै. लोकमत, संपादकीय, दि. ५ जुन २०१७.
२. डॉ. रेषा, ह्या नभाने ह्या भूईला दान द्यावे, अनुबंध प्रकाशन, पृष्ठ क्र १८, १९.
३. उक्त, पृष्ठ क्र. २३.
४. शोधगंगा, पर्यावरण आणि साहित्य संबंध, (www.shodhganga.gov.in)

Assistant Professor
JBSPM's Arts & Sci. College,
Gadhi Tq. Georai Dist. Beed

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013) | October. 2018
UGC Approved Journal Special Issue 66-

प्रसंगाची आनंदमयी उकल करतात. ज्यायोगे आज मराठीत निसर्ग कवितेचे समग्र दालन उभे आहे. बोरकरांनीही कोकणच्या पार्श्वभूमीवरील निसर्ग शब्दबध्द करतांना-

**माझ्या गोव्याच्या भूमीत**
**गड्या नारळ दुधाचे (बोरकर)**

अशा स्वरूपात गोव्याच्या आणि कोकणाच्या समृध्दतेचे वर्णन मराठी कवितेत केले आहे. कोकणच्या पार्श्वभूमी आणि परिसर विज्ञानाच्या, संशोधनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे का? तर त्या भागात असणारा पर्यावरणाचा समतोल. म्हणूनच तेथील वातावरणात अनेक प्रकारच्या जीवसृष्टींना पोषक आहे. आजही तिथे विज्ञानाच्या अनेक संस्था संशोधनाचे काम करतांना दिसतात. त्याचे कारण पर्यावरण, निसर्गाची कोकणातली समृध्दता.

याच परंपरेत ना.घ. देशपांडे, बहिणाबाई इत्यादी मराठी कवींनी निसर्गाच्या विविध प्रारूपांना नवे रंग दिले. पुढे ना.धों. महानोरांनी मराठी कवितेत निसर्गाचं सुंदर चित्र निर्माण केलं.

**गुंतलेले प्राण ह्या रानात माझे**
**फाटकी ही झोपडी काळीज माझे**
**मी असा आनंदूनी बेहोश होता**
**शब्दगंधे तू मला बाहूंत घ्यावे! (रा.क. पृष्ठ १०)**

अशी महानोरांच्या निसर्गाची परिणामक्ता मोजायची असेल तर माझ शेत समृध्द झालं पाहिजे म्हणून तुकोबांच्या शब्दांना प्रसाद म्हणून पुढे ठेवतात. शेतात, निसर्गात रमतांना आलेल्या अनुभवांवर त्यांच्या कवितांचा कौल कायम उभा आहे.

"बालकवी, बहिणाबाई आणि ना.घ. देशपांडे यांच्या प्रभावातून मुक्त झालेल्या त्यांच्या कवितेने मराठी कवितेला एक नवा चेहरा दिला. नव्या नवलाईचा निसर्ग दिला."[३] हा निसर्ग रेखाटतांना पर्यावरणाच्या विपरीत परिणामांचे चित्रणही केले. दुष्काळ, नापिकी, पाण्याचे संवर्धन अशा अनेक प्रकारच्या समस्यांना त्यांनी आपल्या कवितेत शब्द रूप दिले.

**ह्या शेताने लळा लाविला असा की**
**सुख दुःखाला परस्परांशी हसलो-रडलो**
**आता तर हा जीवच अवघा असा जखडला**
**मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो. (रा.क. पृष्ठ १)**

असं सारं निसर्गाचं भावात्म रूप सध्याच्या विज्ञान, तंत्रज्ञानाच्या काळातही मराठी कविता प्रभावीपणे बोलकं करते आहे. एकूणच मानवी चैतन्याचा प्रत्यय निसर्गाला अनुसरून मराठी कवितेत झाला आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. इथल्या प्रत्येक गोष्टींची सांगड ही शेतीशी घातल्या जाते. म्हणूनच तर 'पर्यावरण' आणि 'निसर्ग' या संकल्पना भारतात वेगळ्या करता येत नाहीत. पुढे असाच एक कवी 'आम्ही काबाडाचे धनी' म्हणून राना-मातीचे पर्यावरणीय संदर्भ धुंडाळतांना दिसतो. तो म्हणजे इंद्रजीत भालेराव निसर्गाच्या कृपा-अवकृपेने झालेल्या परिणामांची उकल करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. 'काट्या कुट्याचा तुडवित रस्ता, माझ्या गावाकड चल माझ्या दोस्ता' किंवा 'माती हाच माझा मळा, शपथेचा गळा शेत माझं' अशा स्वरूपाच्या बहिणाबाई आणि महानोरांच्या वळणाची, लोकगीताच्या घाटाची पर्यावरणीय निसर्गात्मक मांडणी त्यांनी केली आणि एका नव्या भावानूभवाची जोड मराठी कवितेला दिली. यांच्या सारखेच आणखीही काही कवी निसर्ग कवितेला समृध्द करण्याचा प्रयत्न करताहेत.

"पण याच काळात माणसाने तर्कशुध्दतेची कास धरून अंतर्मनाचा कौल मांडायला सुरवात केली. तेव्हापासून माणूस निसर्गापासून दुरावला गेला."[४] निसर्गावरच माणसाचे अवलंबित्व असणारा माणूसच निसर्गाचा पहिला मारेकरीही

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66- October. 2018

काहीही करण्यास तयार आहे. तो हे करत असताना पर्वा मात्र कशाचीही करतांना दिसत नाही. म्हणूनच आज जागतिक स्तरावर पर्यावरण ऱ्हास, असंतुलन अशा फार मोठ्या समस्या नव्या-नव्या स्वरूपात उभ्या आहेत. मुळात आनंदाची प्रक्रिया ही मनमोहक आणि विलोभनीय दृश्याच्या माध्यमातूनच ईश्वराची (अलौकीक शक्ती) अनुभूती घेता येते नव्हे ती मिळतेच अशी आहे. अलौकीक शक्ती म्हणजे काय तर आपल्या आजुबाजूस असणारी पर्यावरणीय ऊर्जा आहे आणि तीच जेव्हा काही नाविण्यपूर्ण प्रचिती देते तेंव्हा ती आनंदाला कारणीभूत ठरत असते. म्हणून तर संत तुकारामांच्या या ओळी खूप काही सांगून जातात.

**ओवी संगे दंग | असा अभंग |**
**जनू आभाळात | इंद्रधनुष्य || संत जनाबाई**
**किंवा**
**नामयाच्या जनाईने | केले सडा संमार्जन |**
**हात अबीर मंजिरी | गंधे भारीले गगन || संत जनाबाई**

अशा प्रकारे संत जनाबाई आपली पर्यावरणीय दृष्टी अधोरेखित करतात. ज्यातून पर्यावरणाच्या संदर्भाने बारीक-सारीक गोष्टींची त्या मांडणी करतात. निसर्गासारखी सुखकारक अनुभूती कुठेच मिळणार नाही अशीही प्रचिती त्यातून येत रहाते.

जैववैविध्य आणि विविधतेत एकता यांचा सुरेख मेळ समर्थांनी घातला आहे.

**उदक तारक उदक मारक | उदक नाना सौख्यदायक ||**
**पृथ्वीचे मुळ जीवन | जीवनाचे मुळ दहन |**
**दहनाचे मुळ पवन | थोराहून थोर || (दासबोध-समर्थ रामदास)**

सूक्ष्मजीव हे धुलीकणांपासून सूक्ष्म असतात. याबरोबरच जल जल निर्मिती होते हे तत्त्व समर्थ मांडतात. पण माणसाने "आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करून पर्यावरणाकडून जसा पाहिजे तसा आपला विकास साधून घेतला. मात्र परतफेड करण्याचे साफ विसरला. कृतज्ञ राहण्याचा हा नियम पर्यावरणाशी मानवाने कधीच पाळला नाही. त्यामुळे आज 'पर्यावरण वाचवा' यासारखे वाक्ये कानी पडत आहेत."[१]

भौतिक-अभौतिक गोष्टींविषयी आदर करायला शिकवणारी संताची अभंग आणि वचने होती. ही सुरू झालेली परंपरा निसर्गाच्या बाबतीत आधुनिक काळातील शिकलेल्या पिढीनेही आवती-भोवतीच्या ऋतुचक्राचा अभ्यासातून सुरू ठेवली आणि आपल्या भावानुभवाला शब्दरूप देऊ लागली. "मराठी संतांचे काव्य, शाहिरी व लोक वाङ्मयातून हा निसर्ग आधुनिक कवींनी स्वीकारला आहे. महाराष्ट्र भूमी ही संतांची भूमी आहे. संतांच्या निसर्ग काव्याचा प्रभाव येथल्या कविकुळावर अधिक पडला असण्याची शक्यता अधिक आहे."[२] आधुनिक मराठी कवितेमध्ये निसर्ग कविता नव्याने समोर येऊ लागली यात बालकवींनी निसर्ग, पर्यावरणाचे बोलके चित्रनिर्माण केले आणि मराठी कवितेत खऱ्या अर्थाने निसर्गसृष्टी अवतरली.

| | |
|---|---|
| **हिरवे हिरवे गार गालीचे** | **आनंदी आनंद गडे \|** |
| **हरित तृणाच्या मखमालीचे** | **जिकडे तिकडे चोहीकडे** |
| **त्या सुंदर मखमालीवरती** | |
| **फुलरणीही खेळत होती. (फुलपाखरू)** | **- बालकवींची (समग्र कविता)** |

बालकवींचा एकूण काव्यानुभव हा शब्द चमत्कृतीच्या माध्यमातून निसर्गाकडे, पर्यावरणाकडे पाहण्याची नवी दृष्टी देऊन जातो. तेव्हा आपल्याला आनंद देणारी अशा एकमेव आनंददायी निसर्गशक्तीचे अलौकीकत्व बालकवी प्रतिपादीत करतात. नव्हे निसर्ग काव्याचे ते मराठी कवितेत अग्रदूत ठरतात. म्हणूनच तर त्यांच्या शब्द वाणीतून मनाला भावनाऱ्या अनेक रचना तयार होतात. औदुंबर, पारवा, संध्याराणी, फुलराणी अशा त्यांच्या कितीतरी कविता निसर्गाच्या अद्भूत घटना

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF)-6,261(2017), (CIF) -3,452(2015), (GIF) -0,676 (2013)
UGC Approved Journal Special Issue 66-
ISSN : 2348-7143
October, 2018

# पर्यावरण आणि मराठी कविता

प्रा. रमेश बा. रिंगणे
मराठी विभाग,
ता. कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी
गेवराई जि. बीड.

'सजीवाचा नैसर्गिक परिसर म्हणजे पर्यावरण' या एका वाक्यात सजीवांसाठीच्या हवा, पाणी, पर्जन्य, तापमान इत्यादी सर्वांचा समावेश होतो. या सर्वांच्या चालू असणाऱ्या क्रिया -प्रक्रियांना मिळूनच आपले 'पर्यावरण' निर्माण होते आणि माणसाचे नाते त्याचे परस्पराश्रयी असते. नव्हे सजीवांचा विकास आणि त्यांचा चाललेला जीवन संघर्ष हा पर्यावरणावरच अवलंबून असतो. कारण दोन्ही गोष्टीमध्ये काळ महत्त्वाचा ठरतो. काळानुसार स्वतःत बदल घडवणारा चिरंतन टिकतो. नव्हे पर्यावरण त्यासच सहाय्यकारक ठरत असते. माणसाचे आणि पर्यावरणाचे परस्पर संबंध असतात आणि साहित्य हे माणसाची पहिली सहज अभिव्यक्ती असते. पर्यावरणीय अनुभवांना माणूस साहित्यातून, कवितेतून सहज अभिव्यक्त करत असतो. नव्हे कोणत्याही साहित्याचे सत्व हे 'मूल्यात्म अनुभव' हेच असते आणि एकूण साहित्याचा मुलस्त्रोत हा काव्यात असतो. साहित्याच्या सर्व प्रकारात कविता महत्त्वाची ठरते. कारण या पर्यावरणासह, सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा कोणत्याही घडामोडींचे प्रक्रिया-अंतरक्रियेचे परावर्तन प्रथमतः उमटते ते कवितेतच. मग यात मराठी कविता कशी काय मागे असेल.

पर्यावरणाचे एकूण सारं रूपच भावात्म, आनंददायी, चैतन्यदायी असं आहे. म्हणूनच मराठी कवितेतून पर्यावरण रक्षण आणि संवर्धनाचा संदेश पाहिल्यापासूनच शब्दबध्द झाला आहे. भारतीय साहित्य आणि संस्कृतीने तर पर्यावरण, निसर्गाच्या अनेक प्रारूपाना अत्यंत बारकाईने चिंतनात्मक पातळीवर मांडल्याचे दिसून येते. निसर्गाला भारतीय संस्कृतीने देवत्व बहाल केले आहे. निसर्गाला इथला माणूस पुंजत आला आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी आधारित आहे. त्यामुळेच निसर्गाशी, पर्यावरणाशी अत्यंत जवळचा संबंध आहे. म्हणूनच भारतीय आणि मराठी साहित्यात प्राधान्याने पर्यावरणीय जाणिवा समर्थपणे अभिव्यक्त झाल्याचे दिसते. मराठी कविता तर याही पुढे जाऊन निसर्ग, पर्यावरणाला अत्यंत संवदेनशीलपणे भिडली आहे. निसर्ग कवितेचा तर एक वेगळा प्रवाहच मराठी कवितेत समृध्द झाल्याचे दिसते. निसर्ग हा माणसासमोर आज विविध रूपे घेऊन उभा आहे. म्हणून तर मराठी कवितेतील चिंतन हे पर्यावरण संवर्धानात अत्यंत मोलाचे असे निश्चित ठरणार आहे. पर्यावरण संतुलन आणि संवर्धन करणे हे माणसाचे आद्य कर्तव्य आहे.

पर्यावरणीय जाणिवा ह्या भारतीय साहित्यात अत्यंत प्रग्लभपणे आल्या आहेत. त्या तशाच मराठीतही आल्या. संतांच्या अभंगवाणीत तर 'जे जे भेटे भूत | त्या त्या मानिजे भगवंत' या तत्त्वाची रेलचेल दिसते. माणसाच्या आवती-भोवतीचे जे काही आहे त्या त्या सर्व गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. त्यावरच आपला विकास, प्रगती अवलंबून आहे. याच मांडणीवर संतांच्या अभंग कवितेचा भर दिसतो. जनकल्याण हे पर्यावरण, सभोवतीचा परिसर यांना वजा करून होऊच शकत नाही हे ही संतांनी ओळखले होते.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, जनाबाई, संत कबीर, संत सावता माळी अशी संतांची मांदियाळीच अभंगाच्या माध्यमातून निसर्गावर प्रेम करायला शिकवते.

आनंदाचे डोही | आनंद तरंगे |
आनंदाचे अंग | आनंदाचे || संत तुकाराम

संतांनी आनंदाच्या अनुभूतीची नुसती कल्पनाच रेखाटली असे नव्हे, तर आनंद म्हणजे नेमके काय याचीही उकल केली आहे. आजच्या काळात संत तुकारामांचे हे सुभाषित अत्यंत चपखल बसते आहे. कारण आजचा माणूस आनंदासाठी

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013) | October. 2018
UGC Approved Journal | Special Issue 66-


| | | | |
|---|---|---|---|
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक परिवर्तन | आबासाहेब कसबे | 250 |
| 54 | साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अनुबंध | डॉ. एम.ए. कव्हळे | 254 |
| 55 | भारतीय समाज आणि सामाजिक समस्या | प्रा. आर. के खोकले | 257 |
| 56 | साहित्य आणि समाज | डॉ. सविता खोकले | 263 |
| 57 | वायू प्रदूषण : एक आव्हान | डॉ. दत्तात्रय खुणे | 265 |
| 58 | सत्यशोधक कथेतील समाजजीवन | पल्लवी कोडक | 269 |
| 59 | माळशिरस तालुक्यातील वीटभट्टी उद्योगाचे पर्यावरणीय परीक्षण | प्रा. डी. ए. कोकाटे | 276 |
| 60 | शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे | डॉ. सौ मंजिरी कुलकर्णी | 280 |
| 61 | जागतिक तापमान वाढीचे शेती क्षेत्रासमोरील आव्हान : एक पर्यावरणीय अभ्यास | डॉ. सी. बी. लोंढे | 282 |
| 62 | आदिवासी समुदायातील कला : एक संस्कृती | डॉ. महेश मगर | 287 |
| 63 | आदिम कोलाम समाज व संस्कृती | प्रा. सौ. श्यामला माने व डॉ. शैलजा माने | 290 |
| 64 | महिला पोलीस आणि सामाजिक परिवर्तन | प्रा. जी. टी. मोकासरे | 295 |
| 65 | आपत्ती व्यवस्थापनात स्वयंसेवक संस्थांची भूमिका | डॉ. माधव मोरे | 298 |
| 66 | भारतीय समाज आणि संस्कृती | प्रा. चांगदेव मुंढे | 303 |
| 67 | स्वयं सहाय्यता बचत गटांच्या मार्फत सामाजिक स्थित्यंतरण | प्रा. दत्तात्रय मुंढे | 306 |
| 68 | मानवी जीवन आणि पर्यावरणातील प्रदूषण | डॉ. जनार्दन परकाळे | 310 |
| 69 | पर्यावरण संरक्षण व शासकीय योजनांचा अभ्यास | प्रा. कलंदर पठाण | 315 |
| 70 | शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान | डॉ. सज्जन पवार | 319 |
| 71 | पर्यावरण संरक्षण व संवर्धनात नागरिकांची भूमिका | प्रा.अरुण पेंटावार व प्रा.आशा पोतलवाड | 323 |
| 72 | पर्यावरण आणि मराठी कविता | प्रा. रमेश रिंगणे | 327 |
| 73 | समाज प्रबोधनकार संत गाडगे बाबा | प्रा. दादा साठे | 331 |
| 74 | महादेव कोळी समाजातील स्त्री संस्कृती | डॉ. विकास शेवाळे | 334 |
| 75 | घिसाडी जमातीच्या कौंटुबिक व विवाह पद्धतीतील बदलते स्वरूप | डॉ. जयसिंग सिंगल | 338 |
| 76 | सामाजिक प्रश्न व पर्यावरण | प्रा. विनायक वनमोरे व प्रा. अशोक खोत | 345 |
| 77 | समाज व संस्कृती | सुरेखा व्हसमने | 348 |


## हिंदी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 78 | भारतीय समाज के साहित्य में वर्णित वरिष्ठ नागरिक | डॉ. राजेंद्र बगाटे | 351 |
| 79 | भारतीय संस्कृती : त्यौहार एवं प्रदूषण | डॉ. के. बी. गंगणे | 355 |
| 80 | ग्लोबल वार्मिंग : समस्या और समाधान | डॉ. बी. आर. नळे | 358 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal* | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) -6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013) | October. 2018
UGC Approved Journal | Special Issue 66-

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**October-2018**

**Special Issue-66**

## Society, Culture and Environment

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editor of the issue :**
**Dr. Satish Desai**
**Asso. Prof. Department of Sociology**
**Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe College,**
**Miraj, Dist-Sangli [M.S.] INDIA**

*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

122

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018

Special Issue-66

## Society, Culture and Environment

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Satish Desai
Asso. Prof. Department of Sociology
Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe College,
Miraj, Dist-Sangli [M.S.] INDIA

RESEARCHJOURNEY